# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०–२५६३०२३५
ई–मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

कार्यालयीन परिपत्रक क्र. १९४

जा.क्र. झोपुप्रा/तांत्रिक/१७९४/२०१६
दि. २६/१०/२०१६

विषय : **झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी Defect liability Period निश्चित करणे तसेच या अनुषंगाने सुरक्षा ठेव घेणेबाबत.**

या कार्यालयातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम शासनाच्या दि. ११/०९/२०१४ रोजीच्या मंजुर नियमावलीनुसार करणेत येते. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन घटकाचे बांधकाम पुर्ण झालेनंतर त्यामध्ये गुणवत्तेच्या अनुषंगाने काही दोष निदर्शनात आल्यास त्याबाबतची दुरूस्ती विकसकाकडून करणे बंधनकारक करण्यासाठी भोगवटा दिल्यापासून पाच वर्षांचा कालावधी defect liability period म्हणून निश्चित करणे आवश्यक आहे. या कालावधीतील दोष निवारण्यासाठी पुनर्वसन इमारत बांधकाम खर्चाच्या प्रमाणात काही रक्कम सुरक्षा ठेव म्हणून भोगवटा प्रमाणपत्र देतेवेळी विकसकाकडून भरून घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने मुंबई एस.आर.ए. तसेच शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कार्यपध्दती विचारात घेऊन पुनर्वसन इमारतीच्या वार्षिक बाजार मूल्य दर तक्यात नमुद केलेल्या बांधकामाचे दरानुसार येणा-या मूल्यांकन रकमेच्या ५% इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून भोगवटा प्रमाणपत्र देतेवेळी संबंधीत विकसकाकडुन भरणा करुन घेणेबाबतची कार्यपध्दती निश्चित करणेत येत आहे. ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना सदरच्या सूचना निर्गमित करणेपूर्वी अंतिम भोगवटा प्रमाणपत्र अदा केलेले आहे, अशा योजना वगळुन उर्वरित सर्व योजनांकरिता याप्रमाणे कार्यवाही तात्काळ सुरु करावी. सदरची सुरक्षा ठेव रक्कम संबंधीत योजनेचा भोगवटा प्रमाणपत्र दिल्यापासुन ५ वर्षाच्या कालावधीनंतर संबंधीत विकसकास अदा करणेत येईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी.**
झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- १) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे

२) सहाय्यक संचालक नगररचना,

३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी,

४) उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी,

५) उप अभियंता (तां १) व (तां २)

६) लेखाधिकारी